दै. पुढारी, दि- 12/04/2022

# पोलिस ‘इन ॲक्शन’

## एकाच्या पायावर गोळी घातली; पाच जणांच्या मुसक्या आवळल्या

**नांदेड, पुढारी वृत्तसेवा : बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांच्या हल्लेखोरांचा पोलिस कसून शोध घेत आहेत. घटनेनंतर पोलिसांनी शहरात कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यास सुरुवात केली असून, रेकॉर्डवरील गुन्हेगारांची धरपकड केली जात आहे. दरम्यान घातक शस्त्रासह सोशल मीडियावर छायाचित्रे अपलोड करून दहशत माजविण्याचा प्रयत्न करणाऱ्यासह पाच जणांना इतवारा पोलिसांनी रविवारी रात्री अटक केली असून त्यांच्याकडून तलवारीसह अन्य शस्त्रे जप्त केली आहेत. वरील सर्व आरोपींचा के.बी.गँगशी संबंध असल्याचे पोलिसांनी सांगितले.**

कै. संजय बियाणी यांचे हल्लेखोर सापडत नसल्याने पोलिसांवर मोठा दबाव आहे. हल्लेखोरांच्या शोधासाठी पोलिसांनी एसआयटी स्थापन केली असून विविध पथके हल्लेखोरांचा शोध घेत आहेत. एक - एक धागा जोडत पोलिस हल्लेखोरापर्यंत पोहोचण्याच्या 'ट्रॅक'वर आहेत.

कौठा भागात एका स्वयंघोषित 'डॉन'ला अटक करण्यासाठी गेलेल्या पथकावर कुख्यात संजयसिंह बावरी याने तलवारीने प्राणघातक केलेल्या हल्ल्यात पोलिस कर्मचारी शिवाजी पाटील जखमी झाले होते. बावरीची ही दहशत मोडून काढण्यासाठी ठाणेदार अशोक घोरबांड यांनी त्याच्या पिस्तलातून बावरीच्या पायावर गोळी झाडून त्याच्या मुसक्या आवळल्या. या घटनेतून पोलिसांनी आपले इरादे स्पष्ट केले असल्याने अनेक गुन्हेगार भीतीने अंडरग्राउंड झाले आहेत.

रामजन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला के.बी.गँगचा सदस्य साहिल मदनसिंह ठाकूर याने घातक शस्त्रांसह सोशल मीडियावर छायाचित्र अपलोड केले होते. हे छायाचित्र थेट पोलिस अधीक्षक प्रमोद शेवाळे यांच्या नजरेस पडल्याने त्यांनी इतवारा पोलिसांना साहिल ठाकूरला अटक करण्याचे आदेश दिले होते.



**भगवान धबडगे**
**ठाणेदार**



**असद शेख**
**फौजदार**

इतवाराचे ठाणेदार भगवान धबडगे यांनी पोलीस उपअधीक्षक सिद्धेश्वर भोरे यांच्या सूचनेनुसार कारवाईस सुरुवात केली. पोलिस उपनिरीक्षक शेख असद यांच्या नेतृत्वाखाली एक पथक आरोपीच्या शोधासाठी पाठविण्यात आले. मरघाट येथे नरसिंह ऊर्फ पिंटू माळवतकर आणि आकाश शिंदे हे दोघे हातात तलवार घेऊन सार्वजनिक रस्त्यावर दहशत निर्माण करत असल्याची माहिती मिळाल्याने तेथे जाऊन या पथकाने दोघांना अटक केली. त्यांना पोलिस ठाण्यात आणून 'सुंदरी' दाखविल्यानंतर त्यांनी इतर साथीदारांची नावे सांगून त्यांच्याकडेही शस्त्रे असल्याची माहिती दिली.

या माहितीवरून असद शेख व त्यांच्या पथकाने सिद्धनाथपुरी येथील एका घरावर छापा मारून गजानन मामीडवार, साहिल ठाकूर आणि जयश्री ठाकूर या तिघांना अटक करून त्यांच्याकडून सहा तलवारी, कत्ती, लोखंडी मुठ्ठी, खंजर असे घातक शस्त्र जप्त केले. पथकात ज्ञानेश्वर कलंदर, माही दासरवार, हबीब चाऊस, शेख समीर, नरहरी कस्तुरे, नजरे आझम यांचा समावेश होता.

**आरोपी**



**साहिल ठाकूर**



**आकाश शिंदे**



**नृसिंह माळवतकर**



**गजानन मामीडवार**

### शस्त्र खरेदी-विक्रीचा गोरखधंदा

**नांदेडमध्ये अनेक गुन्हेगार स्वत:कडे घातकशस्त्र बाळगून असतात. या शस्त्राच्या धाकावर नागरिकांना लुटले जाते. या प्रकरणात पोलिसांनी सहा तलवारींसह अन्य शस्त्रे जप्त केली आहेत. जप्त केलेल्या सर्व तलवारी नवीन असून, आरोपी शस्त्रांच्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय करत आहे का? याचा पोलिस तपास करीत आहेत.**